नवराष्ट्र

# मावळमध्ये 'हर घर तिरंगा' अभियानात सहभाग व्हावे

**पुणे,** (वा.)भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. इंडियाआशा फौंडेशनतर्फे या अभियानात वेगळ्याप्रकारे सहभागी होण्यासाठी एक देशभक्तीपर गीत तयार करण्यात आले आहे. मी एक निनावी मावळा र. दि. १३ ऑगस्ट रोजी हे गीत प्रसारितकरण्यात येणार आहे. हर घर तिरंगा अभियानांतर्गत एक आठवड्यात दहा दशलक्ष नागरिकांनी हे गीत ऐकावे/पहावे असे उद्दिष्ट संस्थेने डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने आपले कुटुंबीय, नातेवाईक व परिचित अशा किमान १० सदस्यांपर्यंत मावळा गीत पोहचवावे असे आवाहन इंडियाआशा फौंडेशनतर्फे करण्यात येत आहे. देशसेवेचा वसा स्वीकारून निष्ठेने भारतीय जवान आपल्या प्राणांची पर्वा न करता अहोरात्र कष्ट करतात.

Pune Plus Edition
09 August 2022 Page No. 4
epaper.navarashtra.com